**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ०४ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **माजी केंद्रीय मंत्री आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचं निधन.**
2. **भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची बैठक मुंबईत सुरू.**
3. **स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नवीन प्रभाग रचना आणि ओबीसी आरक्षणासह होणार-सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आव्हान याचिका.**
4. **असंख्य स्थित्यंतरात विद्यापीठानं जपलं वेगळे अस्तित्व-राज्यमंत्री पंकज भोयर यांचं प्रतिपादन, नागपूर विद्यापीठाचा १०२वा वर्धापन दिन उत्साहात.**
5. **अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या सामन्यात भारत विजयी, मालिका बरोबरीत राखण्यात यश.**

---

शिबू सोरेन- निधन

माजी केंद्रीय मंत्री आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचं आज नवी दिल्लीच्या सर गंगाराम रुग्णालयात निधन झालं, ते ८१ वर्षांचे होते. गेल्या अनेक दिवसांपासून ते मूत्रपिंडविकारावर उपचार घेत होते. दीड महिन्यापूर्वी त्यांची प्रकृती अधिक बिघडली होती. शिबू सोरेन हे झारखंड मुक्ती मोर्चाचे संस्थापक सदस्य होते. दुमका मतदारसंघातून ते तीन वेळा लोकसभेवर निवडून गेले होते, तर दोन वेळा राज्यसभेचे सदस्य होते. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या पहिल्या कार्यकाळात ते कोळसा मंत्री होते. मात्र चिरुडीह हत्याकांडात त्यांचं नाव समोर आल्यानंतर त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळातून राजीनामा दिला. २००७ मधे दिल्ली उच्च न्यायालयात त्यांची सुटका झाली. संथाल जमातीतले सोरेन यांनी आदिवासींच्या हक्कांसाठी दीर्घ लढा दिला होता. झारखंडचं मुख्यमंत्रीपद त्यांनी तीन वेळा भूषवलं.झारखंडचे विद्यमान मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे ते वडील होते. शिबू सोरेन यांच्या निधनाबद्दल झारखंडमधे तीन दिवसांचा दुखवटा जाहीर झाला आहे.

---

सोरेन श्रद्धांजली

झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इतर मान्यवरांनी समाज माध्यमावरील संदेशाद्वारे शोक व्यक्त केला आहे. सोरेन यांचं निधन हे सामाजिक न्यायाच्या क्षेत्राचं मोठं नुकसान आहे. सोरेन यांनी आदिवासींना ओळख मिळावी म्हणून आणि झारखंड राज्याच्या निर्मितीसाठी पुढाकार घेतल्याचं राष्ट्रपती मुर्मू यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. तर, सोरेन हे आदिवासी समुदाय, गोरगरीब आणि दलितांचं सक्षमीकरण करणारे नेते होते, अशा शोकभावना पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केल्या आहेत. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्याशी बोलून त्यांचं सांत्वन केल्याचंही मोदी यांनी म्हटलं आहे. शिबू सोरेन हे आपल्या साध्या सरळ व्यक्तिमत्त्वामुळे लोकप्रिय झाले. त्यांच्या निधनाचं वृत्त हे अत्यंत दुःखद असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सोरेन यांना आदरांजली वाहताना लिहिलं की, देशातल्या सर्वात ज्येष्ठ नेत्यांपैकी एक असणारे सोरेन यांनी समाजातल्या दुर्बल घटकांच्या हक्क आणि सक्षमीकरणासाठी आयुष्यभर संघर्ष केला. महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. सोरेन यांनी झारखंडच्या राजकारणात जवळपास पाच दशकं समर्पित भावनेनं काम केलं. त्यांच्या निधनामुळे झारखंडने एक पितृतुल्य व्यक्तिमत्त्व आणि एक कुशल संसदपटू गमावल्याची भावना राज्यपालांनी आपल्या शोकसंदेशात व्यक्त केली आहे.

---------------------------------------------

पतधोरण

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची बैठक आजपासून सुरू झाली. गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखालील ही समिती येत्या बुधवारी पतधोरणाचा द्वैमासिक आढावा जाहीर करेल. आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर पत पुरवठ्याला चालना देण्यासाठी रेपो दरात पाव टक्के कपात होण्याची शक्यता भारतीय स्टेट बँकेनं वर्तवली आहे. मात्र सलग तीन वेळा व्याज दर कमी केल्यामुळे आता रिझर्व्ह बँक व्याज दरात बदल करणार नाही, असं मत काही अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे.

---------------------------------------------

नवीन प्रभाग रचना

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांसंदर्भात आज, सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने महत्वाचा निर्णय दिला आहे. नवीन प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या. तसेच महापालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषदेच्या

निवडणुका या नवीन प्रभाग रचनेनुसार आणि ओबीसी आरक्षणासह करण्याचे आदेश दिले आहेत. या निकालामुळे गेल्या अनेक महिन्यांपासून चर्चेचा आणि अनिश्चिततेचा विषय ठरलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने २७ टक्के ओबीसी आरक्षणाला आव्हान देणारी याचिका फेटाळून लावली आहे. वॉर्ड किंवा प्रभाग रचना हा पूर्णपणे राज्य सरकारचा अधिकार असल्याचं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. या संबंधित दोन याचिका न्यायालयाने फेटाळल्या आहेत. राज्य सरकारने आदेश दिल्यानुसार, नवीन प्रभाग रचनेनुसारच राज्यातील निवडणुका होणार आहेत. त्यामुळे आता महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदांसह सर्व निवडणुका नवीन प्रभाग रचनेनुसार आणि ओबीसी आरक्षणासह घेतल्या जाणार हे आता स्पष्ट झाले आहे. ही याचिका स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षणावर प्रश्न उपस्थित करणारी होती.

---

नामांतर शहीद दिन

मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यात शहीद झालेल्या क्रांतिवीरांना समता सैनिक दल, विविध सामाजिक संस्था, पीपल्स रिपब्लिकन पार्टी यांच्या वतीने इंदोरा येथील दहा नंबर पुलिया जवळ असलेल्या नामांतर शहीद स्मारक येथे अभिवादन करण्यात आले. यावेळेला समता सैनिक दलाच्या वतीने त्यांना सलामी देखील देण्यात आली. 4 ऑगस्ट 1978 ला औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या समर्थनार्थ नागपुरात निघालेल्या शांततामय मिरवणुकीवर झालेल्या गोळीबारात 5 युवक शहीद झाले होते. दरवर्षी हा दिवस नामांतरण शहीद दिन म्हणून  साजरा करण्यात येतो.

---

नागपूर सुधार प्रन्यास

नागपूर सुधार प्रन्यास इमारत पश्चिम विभाग, दुसरा माळा, स्टेशन रोड, सदर, नागपूर इथले  कार्यालय आजपासून नवीन पत्त्यावर स्थलांतरित करण्यात येत आहे. आता हे कार्यालय इमारत पश्चिम विभाग नागपूर सुधार प्रन्यास सदनिका क्रमांक **A-207 to A-208, A-Wing,** दुसरा माळा, एन.आय.टी., भामटी हाऊसिंग स्कीम, लंडन स्ट्रीट इथे असेल. इमारत पश्चिम विभाग नासुप्रशी संबंधित पत्रव्यवहार स्थानांतरित पत्त्यावर करावेत, असे एका पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

---

१०२वा वर्धापन दिन

असंख्य स्थित्यंतरात ही विद्यापीठाने वेगळे अस्तित्व जपले असल्याचे प्रतिपादन राज्यमंत्री आणि वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा शतकोत्तर दूसरा वर्धापन दिन आज अंबाझरी मार्गावरील गुरुनानक भवन इथं पार पडला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून डॉ. भोयर मार्गदर्शन करीत होते. या कार्यक्रमात माजी खासदार दत्ताजी मेघे यांना जीवन साधना पुरस्काराने सन्मानित तर अन्य पुरस्काराचे वितरण करण्यात आलं. अमरावती आणि गोंडवाना विद्यापीठ वेगळे झाल्यानंतर देखील विद्यापीठाने स्वतःचे अस्तित्व कायम ठेवत विद्यादान सुरू ठेवले आहे. नवनवीन अभ्यासक्रम सुरु करीत येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्ट्या सक्षम करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य विद्यापीठाने केल्याचे डॉ. भोयर म्हणाले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या नावाने असलेल्या विद्यापीठाने त्यांच्या विचाराने मार्गक्रमण करीत आदर्श विद्यार्थी घडविण्याचे कार्य सातत्याने सुरू ठेवावे, असे ते म्हणाले. यावेळी विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले यात सर्वोत्कृष्ट अधिसभापटू पुरस्कार, आदर्श अधिकारी पुरस्कार, आदर्श विद्यार्थी पुरस्कार अश्या पुरस्कारांचा समावेश होता.

---------------------------------------------

क्रिकेट

अँडरसन तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेच्या आजच्या ओव्हल मैदानावर भारतीय संघाने अटीतटीच्या सामन्यात विजयश्री खेचून आणली. यासोबतच भारताने ही मालिका बरोबरीत ठेवण्यात यश मिळवला आहे. भारतीय संघाने इंग्लंडच्या संघाला जिंकण्यासाठी आवश्यक असलेल्या 374 धावांचा पाठलाग करत असताना 367 धावांवर रोखण्यात यश मिळवलं. तत्पूर्वी इंग्लंडकडून जो रूट आणि हॅरी ब्रूक यांनी 195 धावांची भक्कम भागीदारी केली परंतु आकाशदीपच्या भेदक गोलंदाजी नं ब्रूकचा बळी घेतला. प्रसिद्ध कृष्णाने जो रूट ला तंबूत परत पाठवले. आजच्या दिवसाची सुरुवात इंग्लंडला सहा गडी बाद 339 धावां वरून केली. यष्टीरक्षक जेमि स्मिथ लाबाद करून बाजी भारताच्या बाजूने फिरवली. मोहम्मद सिराजला सामनावीर तर शुभमन गिल आणि हॅरी ब्रुक यांना मालिकावीर पुरस्कार प्रदान करण्यात आले.

---------------------------------------------

हवामान

येत्या काही तासात विदर्भातील नागपूर, चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी वादळासह हलक्या पावसाची शक्यता असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे.

---------------------------------------------

नवीन शिक्षण धोरण

प्राचीन शिक्षण पध्दतीमध्ये व्यक्तिमत्व विकास, ज्ञानार्जन हा मुख्य उद्देश होता, मात्र कालानुरुप हा उद्देश मागे राहिला. आता नोकरी मिळविणे हाच शिक्षणाचा उद्देश झाला आहे. विद्यार्थ्यांचा हा बदलता कल पाहता, नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थ्याला पाहिजे ते आणि आवडीचे शिक्षण घेण्यास मदत करते आणि विद्यार्थी आपले ध्येय गाठू शकतात, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील शारीरिक शिक्षण विभाग आणि मालवीय मिशन टिचर ट्रेनिंग सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत आयोजित 'होलिस्टिक ॲन्ड मल्टीडिसिप्लीनरी एज्युकेशन' विषयावर आणि 'ऑल राऊंड डेव्हलपमेंट थ्रू मल्टीडिसिप्लीनरी ॲप्रोच 'या थीमवर साप्ताहिक राष्ट्रीय कार्यशाळेचं उद्घाटन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते झाले.

---------------------------------------------

डोळ्यांचे आजार

वर्धा जिल्ह्याला पुर्णपणे मोतिबिंदू मुक्त करण्याचा संकल्प आपण केला असून लवकरच हा संकल्प पूर्ण करु, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले. पांदण रस्ते मोकळे करण्यासाठी पैसे भरुन पोलिस बंदोबस्त घ्यावा लागत होता. आता मोफत बंदोबस्त उपलब्ध होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. मोतिबिंदू विरहीत वर्धा अभियानांतर्गत कारंजा येथे आयोजित शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी पालकमंत्री बोलत होते.

---------------------------------------------